## नियमीत दरखास्त क्र.२५/२०१५ मधील नि. २१ खालील आदेश

**(सौ.आक्काताई आनंदा गायकवाड वगैरे वि. आनंदा पांडुरंग गायकवाड)**

१. अर्ज व म्हणणे वाचले. धनकोतर्फे विधिज्ञ श्री.एन.एस.पाटील व ऋणको तर्फे विधिज्ञ श्री.पी.ए.महाजन यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी दावा मिळकती जमीन गट नं.१३८८, १२३५, १२८८, ९११ या मौजे माळवाडी, ता. पन्हाळा येथील जमिनीतील व मौजे मानेवाडी येथील गट नं.३२२ या जमिनीतील ऋणकोने केलेले ऊसाचे पीक जप्त करुन ते न्यायालयीन आयुक्तांमार्फत श्री.दत्त सहकारी साखर कारखाना (दालमिया भारत शुगर लिमिटिडे, शाखा आसुर्ले–पोर्ले) येथे पाठविणेबाबतचा व सदर ऊस बिलाची रक्कम न्यायालयात जमा करुन घेणेसाठी दाखल केलेला आहे.

२. ऋणको यांनी सदर अर्जास (नि.क्र.२९) अन्वये म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. ऋणको यांचे म्हणणेनुसार अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा असून अर्जदार यांनी कोणत्या गांवातील, गटातील व कोणाच्या मालकीचा ऊस कारखान्यास विक्रीस पाठविणेचा आहे, याबाबत नमूद केलेले नाही व मोघम स्वरुपी अर्ज दाखल केलेला आहे. त्याचबरोबर, अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले नाही. जमिन गट नं.९११, १२८८, १३८८ या जमिनी ऋणको, ऋणकोची आई श्रीमती हिराबाई पांडुरंग गायकवाड, ऋणकोच्या बहिणी आक्काताई सर्जेराव पाटील व मंगल दगडू पाटील यांचे समाईक मालकी वहिवाटीचे असून त्यांचेमध्ये सदर जमिनींचे सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही. गट नं.१३८८ मध्ये बाजीराव दगडू चौगुले, तातोबा दगडु चौगुले यांचे हिस्याचे २०.८०२.१४ आर क्षेत्र आहे व सदर गटाचे हिस्येदारांदरम्यान वाटप झाले नसून समाईक वहिवाट आहे. गट नं.३२२ व १२३५ या जमिनीचे मालकी वहिवाटीशी ऋणकोचा काहीही हितसंबंध नाही व गट नं.१२३५ ही जमीन नामदेव पांडुरंग निकम यांचे वहिवाटीची असून त्यांचे नांव ७/१२ उताऱ्यास नमूद आहे. गट नं.३२२ ही जमीन पांडुरंग श्रीपती खोत यांचे मालकी वहिवाटीचे असून गट नं.९११ ही जमीन भाऊसाहेब नाथा तुरुंबेकर यास खरेदी दिलेली आहे. सदर अर्जात नमूद केलेल्या जमिनी या ऋणको याच्या एकटयाच्या मालकी वहिवाटीच्या नाहीत व अदयाप ऋणको याचा हिस्सा ठरलेला नाही. त्यामुळे त्या जमिनीतील ऊस जप्त करुन विक्रीस कारखान्यास पाठविता येणार नाही. ऋणको याचे असेही म्हणणे आहे की, ऋणको याने ऊस पिकाची कोणत्याही प्रकारे तोड करणेस सुरुवात केलेली नव्हती

व नाही. धनको मिळवती असून स्वतःचा चरितार्थ चालविणेस समर्थ आहे. तसेच, ७/१२ पत्रकी नोंद असणारे सर्व सहहिस्सेदार हे दावेस व दरखास्तीस पक्षकार नव्हते. त्यामुळे ऋणको यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. धनको तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. पाटील यांनी युक्तिवाद केला की, ऋणको यांनी रे.दि.मु.नं.१०७/२०१४ मधील आदेशाप्रमाणे धनको यांचे पोटगीची रक्कम भरलेली नाही व ऋणको हा जाणुनबुजून पोटगीचे पैसे भरत नाही व त्यामुळे धनको यांची उपासमार होत आहे. अर्जात नमूद केलेल्या मिळकतींमध्ये ऋणको यांचा हिस्सा असून सदर मिळकतींवर या न्यायालयाने यापुर्वीच पोटगी रक्कमेचा बोजा ठेवणेबाबत आदेश केलेला आहे व सदर जमिनीतील ऊस पीक जप्त करुन कारखान्यास घालवण्यात यावे व त्याची रक्कम धनको यांना देणेत यावी. याउलट ऋणको तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. महाजन यांनी युक्तिवाद केला की, अर्जात नमूद केलेल्या गट नंबरमध्ये ऋणको याची एकटयाची स्वतंत्रपणे मिळकत नाही. धनको यांनी सदर अर्जापुष्ठयर्थ शपथपत्र दाखल केलेले नाही. त्याचबरोबर, अर्जातील मजकूर खरा नाही. सदर मिळकतींवर ठेवलेला बोजा हा सदर मिळकतींची विल्हेवाट लावू नये यासाठी ठेवलेला आहे व गट नं.९११, १२८८ व १३८८ या मिळकती सामाईक असून गट नं.१३८८ मध्ये बाजीराव व तातोबा चौगुले यांचे नांव आहे, मात्र ते दाव्यात पक्षकार नव्हते. त्यामुळे ऋणकोतर्फे विधिज्ञांनी सदर अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुत कामी अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दरखास्त ही धनको यांनी रे.दि.मु नं.१०७/२०१४ मधील आदेशाप्रमाणे ऋणको यांचेकडून पोटगी रक्कम रुपये २,५८,०००/- वसुल होवून मिळणेसाठी दाखल केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये ऋणको हे न्यायालयात हजर राहतात, मात्र त्यांनी रे.दि.मु.नं.१०७/२०१४ मधील आदेशाप्रमाणे धनको यांचे पोटगी रक्कमेपैकी कांहीही रक्कम भरलेली दिसून येत नाही. सदर अर्जाचे म्हणणेमध्ये ऋणको यांनी घेतलेला बचाव की, धनको ही मिळवती असून स्वतःचा चरितार्थ चालविणेस समर्थ आहे, हा बचाव रे.दि.मु.नं.१०७/२०१४ मधील न्यायनिर्णयाचे प्रकाशामध्ये मुळीच स्विकारता येणार नाही. त्याचबरोबर, ऋणको याने रक्कम रु.२,५८,०००/- धनको यांच्या पोटगी पोटी देणे लागते,

ही बाबही ऋणको यांनी स्पष्टपणे नाकारलेली नाही.

५. प्रस्तुत कामी अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, माझे मा. पुर्वधिकाऱ्यांनी धनको यांचे नि.११ वरील आदेशाप्रमाणे ऋणको यांचे मौजे माळवाडी, ता. पन्हाळा येथील शेत जमीनी गट नं.१२८८, ९११, १३८८ व १२३५ या मिळकतींवर धनको यांचे थकित पोटगी रक्कम रु.२,५६,०००/- चा बोजा नोंद करणेबाबत दिनांक ०१/०१/२०१६ रोजी आदेश केलेला आहे. याठिकाणी ही बाब उल्लेखनीय आहे की, सदर अर्जाचे (नि.क्र.११) व त्यावरील आदेशाचे अवलोकन केले असता, सदर अर्जास ऋणको यांनी त्यांना संधी देवुनही म्हणणे दाखल केले नव्हते व अर्जास विरोधही केलेला नव्हता.

६. धनको यांनी नि.क्र.३२ चे कागदपत्र यादीसोबत जमीन गट नं.१२८८, १३८८, ९११, १२३५, ३२२ या जमिनी मिळकतींचे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केलेले आहेत. सदर ७/१२ उताऱ्यांवरुन गट नं.१२८८ मधील १८ गुंठे क्षेत्र हे हिराबाई पांडुरंग गायकवाड, आक्काताई सर्जेराव पाटील, मंगल दगडू पाटील व ऋणको आनंदा पांडुरंग गायकवाड यांचे नांवे समाईकात नोंद आहे. त्याचबरोबर गट नं.१३८८ व ९११ या जमिनीतील अनुक्रमे २२.४०२.३२ व १८.२०२.०९ एवढे क्षेत्र वरील नमूद ऋणको व त्याची आई व बहिणी यांचे नांवे नमूद आहे. त्याचबरोबर, गट नं.१३८८ मधील २०.६०२.१४ एवढे क्षेत्र बाजीराव दगडू चौगुले यांचे नांवे असून गट नं.१२३५ व ३२२ मधील क्षेत्र नामदेव पांडुरंग निकम व पांडुरंग श्रीपती खोत यांचे नांवे नोंद आहे. त्यामुळे सदर उताऱ्यावरुन ऋणको आनंदा व त्याची आई हिराबाई, बहिणी मंगल व आक्काताई यांचे नांवे सदयःस्थितीत गट नं.१२८८, १३८८ व ९११ या मिळकतींमधील अनुक्रमे १८, २२.४० व १८.२० गुंठे एवढे क्षेत्र नमूद आहे. सदर मिळकती या ऋणको व त्याची आई व बहिणी यांचेमध्ये समाईक असल्याचे ऋणको याचे कथन आहे. त्यामुळे सदर बाबींचा व अर्जदार यांचे सदर अर्जातील मागणीचा विचार केला असता, वरील नमूद गट नंबरमध्ये ऋणको यांचे हिस्याचे ऊस पिकाची रक्कम पोटगी रक्कमेचे देणेपोटी धनको यांना देणे योग्य होईल असे वाटते. त्यामुळे गट नं. १२८८, १३८८ व ९११ या जमिनीतील ऋणको आनंदा व त्याची आई हिराबाई पांडुरंग गायकवाड व ऋणकोच्या बहिणी नामे आक्काताई सर्जेराव पाटील व मंगल दगडू पाटील यांचे समाईक हिस्यातील वर नमूद क्षेत्रातील ऊस तोड करुन तो साखर

कारखान्यास गाळपासाठी घालणेकामी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करणे योग्य होईल. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वर नमूद गट नं.१२८८, १३८८ व ९११ मधील ऋणको व त्याचे आई व बहिणी यांचे समाईकातील ऊस असल्याने ऋणकोची आई हिराबाई व बहिणी मंगल व आक्काताई हे त्यांचे हिस्याची ऊस बिलाची रक्कम कारखान्याकडून त्यांना मिळणेस पात्र असतील, मात्र ऋणको याचे हिस्याचे ऊस बिलाची रक्कम धनको यांचे पोटगी पोटी धनको यांना देणेसाठी न्यायालयात जमा करणेत यावी. सबब, वरील सर्व नमूद कारणांचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहेः-

## आदेश

अ) अर्ज मंजूर करणेत येतो.

ब) न्यायालयीन आयुक्त म्हणून विधीज्ञ श्री. ए.ए.बच्चे-पाटील यांची नेमणुक करणेत येत आहे.

क) न्यायालयीन आयुक्तांनी मौजे माळवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील भू.गट नं१२८८, १३८८ व ९११ या मिळकतीमधील ऋणको आनंदा पांडुरंग गायकवाड व त्यांची आई हिराबाई पांडुरंग गायकवाड व ऋणकोच्या बहिणी नामे आक्काताई सर्जेराव पाटील व मंगल दगडू पाटील यांचे समाईकातील अनुक्रमे १८, २२.४० व १८.२० गुंठे क्षेत्रातील ऊस मजुरामार्फत तोडणी करुन तो ऊस सदर अर्जात नमूद श्री.दत्त सहकारी साखर कारखाना (दालमिया भारत शुगर लिमिटिडे, शाखा आसुर्ले-पोर्ले) येथे आपले नांवे गाळपासाठी पाठवावा व सदर ऊस बिलाचे रक्कमेपैकी ऋणको याचे १/४ हिस्याची रक्कम धनको यांचे पोटगीचे रक्कमेपोटी न्यायालयात जमा करावे. ऊस बिलातील ऋणको याचे हिस्से व्यतिरिक्त उर्वरीत ३/४ हिस्सेची रक्कम ऋणको याची आई हिराबाई पांडुरंग गायकवाड व ऋणकोच्या बहिणी नामे आक्काताई सर्जेराव पाटील व मंगल दगडू पाटील यांना प्रत्येकी १/४ प्रमाणे देणेत यावी व त्याबाबतचा अहवाल आजपासून तीस दिवसांचे आत अभिलेखावर दाखल करावा.

ड) न्यायालयीन आयुक्तांनी श्री.दत्त सहकारी साखर कारखाना (दालमिया भारत शुगर लिमिटिडे, शाखा आसुर्ले–पोर्ले) यांना ऊस तोडणी बाबतची कल्पना देवून कारखान्याला ऊस पोहचवण्याची पूर्तता करावी.

इ) धनको यांनी न्यायालयीन आयुक्तांचे खर्चापोटी प्राथमिक शुल्क म्हणून रुपये ३,०००/- आजपासून सात दिवसांचे आत न्यायालयात जमा करावे.

ई) विधिज्ञ श्री.ए.ए.बच्चे पाटील यांना सदर कामी त्यांची नेमणुक न्यायालयीन आयुक्त म्हणून झालेबाबत न्यायालयासमक्ष सांगण्यात आले आहे.

उ) न्यायालयीन आयुक्तांनी ऋणको–धनको अथवा त्यांच्या विधिज्ञांना कमिशनची नोटीस देण्याची आवश्यकता नाही, त्याबाबतची कल्पना उभय पक्षकारांना आणि त्यांचेतर्फे विद्वान विधिज्ञांना न्यायालयासमक्ष दिलेली आहे.

ऊ) धनको यांनी न्यायालयीन आयुक्तांचे शुल्क भरलेनंतर व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर कमिशनपत्र पाठवणेत यावे.

दिनांक १६/०१/२०१७ स्वाक्षरी/-
पन्हाळा. (वि. आ. अवघडे)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

**-: <u>प्रमाणपत्र</u> :-**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र/आदेशातील मजकूराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | श्री.अ.आ.पाटील |
| न्यायालयाचे नांव | श्री.वि.आ.अवघडे |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | १६-०१-२०१७. |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | १६-०१-२०१७. |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | १७-०१-२०१७. |